 सं.फौ.ख.क्र.८४५/२०२५

**श्री. पी.के.मुटकुळे न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग, कुही, जि.नागपूर.**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | १२.१०.२०२५ |
| २ | अहवालाचा किंवा फिर्यादचा दिनांक | १२.१०.२०२५ |
| ३ | फिर्यादीचे नांव, त्याच्या आई व वडिलांचे नांव, त्याचे वय व निवासस्थान इ. | पोलीस निरिक्षक, कुही पोलीस ठाणे, ता. कुही, जि.नागपूर. |
| ४ | आरोपीचे नांव, आरोपीच्या आई व वडिलांचे नावगांव व त्याचे निवासस्थान इ. | १) अश्वीन संतय गणवीर वय– ३१ वर्षे,<br>२) सुदत्त सदानंद चहांदे वय –३० वर्षे,<br>रा. संकटमोचन मंदीरजवळ, हुडकेश्वर रोड, नागपूर.<br>३) विशाल मोरेश्वर सातपूते वय–४१ वर्षे, शामनगर, हुडकेश्वर रोड नागपूर.<br>४) आशिष श्रीक्रीष्णराव नाकाडे वय–४८ वर्षे, रा. १८, अलंकार नगर, बेसारोड, नागपूर, ता. व जि. नागपुर.<br>५) राहुल गुलाबराव गायकवाड वय–३७ रा.– मानेवाड रिंगरोड मेजर जकाते शाळेजवळ, नागपूर. ता. व जि. नागपूर. |

५ (अ) ज्याबद्यल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील –

तुम्ही दिनांक १२.१०.२०२५ रोजी १५.४० ते १६.३० वाजताच्या सुमारास मौजा निंबा ते चिकना रोड, ता. कुही जि. नागपूर येथे तुम्ही सार्वजनिक ठिकाणी ५२ तास पत्ते जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आलात व त्यायोगे महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ अन्वये शिक्षापात्र असलेला या न्यायालयाच्या दखलक्षेत्रात गुन्हा केला.

सं.फौ.ख.क्र.८४५/२०२५

आणि म्हणुन मी तुमच्यावर सदरहू आरोप ठेवीत आहे.

(पी. के. मुटकुळे)

दि. ०९.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

कुही, जि. नागपूर.

**<u>आरोपीचे निवेदन –</u>**

| | | |
|---|---|---|
| प्रश्न १ | | तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न २ | | तुम्हाला वाचुन व समजावुन सांगितलेला आरोप समजला काय ? |
| उत्तर | | होय. |
| प्रश्न ३ | | तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ? |
| उत्तर | | होय, आम्हाला गुन्हा कबुल आहे. |

१)_________ २)_________ ३)_________

४)_________ ५)_________

आरोपींची सही/अंगठा

(पी. के. मुटकुळे)

दि. ०९.०५.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

कुही, जि.नागपूर.

## न्यायनिर्णय

आरोपींनी त्यांना प्रस्तुत गुन्हा मान्य व कबूल असल्याचे कथन केलेले आहे. त्याबाबत त्यांनी नि.क्र.२ वर पुर्सीस दाखल केली आहे. आरोपी स्वखुशीने गुन्हा कबुल करत असल्याची खात्री केली. आरोपींचा गुन्हा हा पहिलाच असल्यामुळे महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे, द्रव्य दंडाची शिक्षा आरोपीस पुरेशी आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. आरोपी क्र.१) अश्वीन संजय गणवीर, २) सुदत्त सदानंद चहांदे, ३) विशाल मोरंश्वर सातपूते, ४) आशिष श्रीक्रीष्णराव नाकाडे ५) राहुल गुलाबराव गायकवाड यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २७५ प्रमाणे महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदा कलम १२–अ या गुन्हयासाठी दोषी ठरविण्यात येउन प्रत्येकी रुपये ३००/– (रुपये तीनशे मात्र) प्रत्येकी च्या दंडाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास त्यांना १ दिवस साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

२. सदर प्रकरणातील जप्त मुद्येमाल रोख रक्कम सरकारजमा करण्यात यावी व उर्वरीत मुद्येमाल मुल्यहीन असल्याने नष्ट करण्यात यावा.

PARASRAM KUNDLIK MUTKULE
Digitally signed by PARASRAM KUNDLIK MUTKULE
Date: 2026.05.09 14:18:40 +0530

(पी. के. मुटकुळे)

दि. ०९.०५.२०२६

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

कुही, जि.नागपूर.